Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# वैश्विक कल्याणाकडे नेणारा राजमार्ग अर्थात वसुधैव कुटुंबकम

**डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर**
सहयोगी प्राध्यापक
राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय,पारोळा

## प्रस्तावना

'हे विश्वचि माझे घर ' या विचारापर्यंतचा पल्ला गाठण्यासाठी स्वार्थ त्यागाची भूमिका समाजातील प्रत्येक घटकाला घेणे गरजेचे आहे. आपल्या देशात विविध जातीची, पंथाची, प्रांताची, संप्रदायाची जनता रहिवास करते. जेवढ्या जातीपाती, धर्म, पंथ, प्रांत, संप्रदाय अस्तित्वात आहेत. तेवढ्याच त्यांच्या विचारांमधली तफावत, आचारांमध्ये असलेला बदल या साऱ्या बाबी राष्ट्राची एकसंघता, एकरूपता यासाठी बाधक ठरतात. भौगोलिक दृष्ट्या विविधता असलेल्या आपल्या राष्ट्रात सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या सुद्धा वैविधता आहे. प्रत्येक व्यक्तीला आपला समाज, आपला वर्ग हा उच्च वाटतो. वैचारिकतेत असलेला हा फरक हे विश्वची माझे घर ही संकल्पना साकार करण्यात मोठा अडसर ठरतो. आपल्या राष्ट्रात ही वैविधता असली तरी साऱ्या विश्वात विविध संत, विचारवंत, महंत होऊन गेले. त्यांनी आपल्या विचार प्रणाली मधून आणि धर्म तत्वज्ञानातून `वसुधैव कुटुंबकम` ची संकल्पना प्रकर्षानं प्रकट केलेली दिसते. विविध धर्म संप्रदाय त्यांचे तत्त्वज्ञानात सुद्धा सर्व प्राणीमात्रांवर दया करा.. प्रत्येकाशी सन्मानाने, आदराने वागा . कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्या. या बाबी प्रामुख्याने मांडलेल्या दिसतात. म्हणजेच केवळ मानवी समाज नव्हे तर साऱ्या प्राणीमात्रावर आपण प्रेम केलं पाहिजे. आपल्या कुटुंबातलेच सदस्य त्यांना मानले पाहिजे. वसुधैव कुटुंबकमच्या संकल्पनेत जात, धर्म, पंत, प्रांत, लिंग या कोणत्याही गोष्टी आड येणार नाहीत. अडसर ठरणार नाहीत. याची दखल सर्व महापुरुषांनी घेतलेली आपल्याला दिसते. किंबहुना घटनात्मक दृष्टिकोनातून पाहता राष्ट्रातील प्रत्येक घटकाला स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा अधिकार कायद्याने बहाल केलेला आहे. प्रत्येकाला हक्क आणि अधिकार हे कायद्याने, घटनात्मक दृष्ट्या प्राप्त झालेले आहेत. जगत कल्याणासाठी सार आयुष्य पनास लावणारे असंख्य महापुरुष आपल्या राष्ट्रात होऊन गेले. ज्यांनी आपल्या विचार आणि कार्यातून विश्वशांतीचा संदेश दिला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आताच्या युगात हा विश्वशांतीचा संदेश निश्चितच दीपस्तंभाची भूमिका पार पाडेल. विविध धर्म आणि प्रांतांमध्ये असलेली सांप्रदायिकता त्यातून उद्भवलेल्या दंगली, दहशतवाद्यांच्या अतिरेकी कारवाया या साऱ्या बाबी विश्व शांतीला बाधक ठरणाऱ्या झालेल्या आहेत. अखिल जगताने विज्ञान तंत्रज्ञानाची कास धरलेली आहे. साऱ्या विश्वाला कवेत घेण्याची क्षमता आजच्या आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञाच्या युगात झालेली आहे. औद्योगिक दृष्ट्या प्रत्येक राष्ट्र अग्रेसर आहे. प्रत्येक राष्ट्राने औद्योगिक क्षेत्रात पदार्पण केलेले आहे. त्यासोबतच आपल्या विशाल महाकाय राष्ट्राला सुरक्षित राखण्यासाठी विविध विघातक शस्त्रास्त्र निर्मितीची जणू शर्यतच त्यांची लागलेली आहे. स्वबळावर प्रत्येकाचाच आत्मविश्वास निर्माण झालेला आहे. हा अति आत्मविश्वास स्वार्थाला चालला देतो. आक्रमक राष्ट्र आपले वर्चस्व कमकुवत राष्ट्रावर, समाजातील ताकतवर वर्ग समाजातील कमकुवत वर्गावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू करतो. स्वार्थाने आणि गर्वाने अशी मंडळी पछाडलेली असते. या बाबीचा विघातक परिणाम झालेला आहे. शांतताप्रिय राष्ट्रांवर आक्रमक हल्ले करून जागतिक शांतता धोक्यात येत आहे. त्याचा परिणाम अप्रत्यक्षरीत्या राष्ट्रातील निरअपराध जनतेवर होतो. समाजातील शांती, स्वास्थ्य नष्ट होते. एकूणच त्याचा मानवी जीवनावर खोलवर परिणाम होतो. सामाजिक अस्थिरता निर्माण होते.एकूणच या गोष्टींचा परिणाम मानवाच्या सर्वांगीण

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

जीवनावर होतो. आंतरराष्ट्रीय शांतता, सामाजिक विकास आणि मनस्वास्थ्यासाठी विश्वशांतीचा संदेश साऱ्या विश्वाला देण्याची गरज आधुनिक काळात निर्माण झालेली आहे. आम्हाला अगदी पौराणिक काळापासून आमचे संत महंत थोर महात्मे सांगत आलेले आहेत. त्या विचारांचा अनुनय करण्याची गरज आहे. दहशतवाद्यांच्या अतिरेकी कारवायांनी सारे विश्वच हवालदिल झालेले आहे. धर्मवेड्या वर्गामुळे सामाजिक स्वास्थ्यालाही बाधा आलेली आहे. धर्म संकल्पनेचा संकुचित आणि चुकीचा अर्थ लावून समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न अगदी पूर्वापारपासून चालत आलेला आहे. आधुनिक काळातही या गोष्टी समाजात मोठ्या प्रमाणात खूप फोफावलेल्या दिसतात. अफवा ,चुकीच्या बाबीचे समर्थन करणारी मंडळी समाजात कार्यरत आहे. कट्टर धर्मवादाने पछाडलेली मंडळी त्यांच्या धर्मवेड्या धोरणाने सारी मानव जातच कुलशीत करण्याचा प्रयत्न करीत असतात. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे वाढते पेव कुठेतरी आपले सांस्कृतिक भान हरवत चाललेले आहे. म्हणूनच समाजाला विश्वशांतीचा संदेश देणारे तत्त्वज्ञान देणे गरजेचे आहे. साऱ्या विश्वाकडे आम्ही जोपर्यंत कुटुंब म्हणून पाहत नाही तोपर्यंत या गोष्टी होणे शक्य नाही.

### वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेचा संदेश देणाऱ्या ज्ञानेश्वर माऊली :

आपल्या देशाला संत महंत यांचा मोठा सांस्कृतिक आणि अध्यात्मिक ठेवा लाभलेला आहे. १३ व्या शतकातील महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर माऊली यांनी आपल्या आघाध ज्ञानाने महाराष्ट्राच्या प्रबोधनात मोलाची भर घातली आहे. त्यांनी अखिल मानव जातीला दिलेला ज्ञानग्रंथ अर्थात ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अध्यात्म ज्ञानाच्या संदर्भात मौलिक स्वरूपाचा मानला जातो. त्याचबरोबर सुदृढ, निकोप समाज व्यवस्थेच्या उभारणीसाठी एकूणच मानवी जीवनाच्या जडणघडणीसाठी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ दीपस्तंभा ची भूमिका बजावतो. `हे विश्वचि माझे घर` ही संकल्पना ज्ञानेश्वर माऊलींनी मांडलेली आहे. या संकल्पनेतून प्रामुख्याने विश्वबंधुत्वाची भावना प्रकट होताना दिसते. हे सारं विश्व, त्यातील मानव सर्व सजीव प्राणिमात्र हे माझे बांधव आहेत. ते माझं कुटुंब आहे. ही भावना, हा विचार देणारी ही संकल्पना खऱ्या अर्थाने सर्वव्यापी आहे. `वसुधैव कुटुंबकम` ही संकल्पना जरी आपण २१ व्या शतकातली मानत असू. तरी तिचा मुळाधार १३ शतकात ज्ञानेश्वर माऊलींनी मांडलेल्या ` हे विश्वचि माझे घर` या संकल्पनेत दिसून येतो. व्यवस्थेत असलेल्या जात, धर्म, पंथ, प्रांत या संकुचित वृत्तीच्या भिंती नष्ट करून मानवाचा विशाल दृष्टिकोन तयार करणे. व्यापक नजरेतून साऱ्या विश्वाकडे बघणे ` हे विश्वची माझे घर` या संकल्पनेत अपेक्षित आहे. आत्मा आणि परमात्मा एकच असून तो चराचर सृष्टीत सामावलेला आहे. म्हणजेच विश्वाच्या साऱ्या घटकांमध्ये परमेश्वराचं अस्तित्व आहे हा विचार या संकल्पनेतून ज्ञानेश्वर माऊलींनी मांडलेला आहे. ज्ञानेश्वर माऊली पसायदानात म्हणतात, `आता विश्वात्मके देवे येणे वाग्यज्ञ तोषावे तोषणी मज द्यावे पसायदान हे`...! माऊली परमेश्वराला साकळ घालतात त्यात ते स्वतःसाठी कोणतीही मागण मागत नाहीत. जगत कल्याणाचे दानच ते यातून मागताना दिसतात. या संकल्पनेत खोलवर डोकवल्यावर लक्षात येते की सध्याच्या काळातील फोफा वलेला दहशतवाद, आंतरराष्ट्रीय असुरक्षितता, अशी संकटे साऱ्या विश्वासमोर आ वासून उभी आहेत. या स्थितीत ज्ञानेश्वर माऊलींनी मांडलेला ` हे विश्वचि माझे घर`हा विचार निश्चितच जगत कल्याणासाठी आवश्यक आहे. सर्व धर्म तत्त्ववेत्यांनी सुद्धा सर्व मानव परमेश्वराची लेकरे आहेत. श्रेष्ठ~ कनिष्ठ, उच~ नीच असा कुठलाही भेदभाव नाही. किंबहुना या विश्वाची निर्मिती हाच एक दैवी चमत्कार आहे. म्हणूनच हे विश्व त्यातील साऱ्या चराचर सृष्टीत शांतता, स्थैर्य आणि सामंजस्य सदैव नांदत राहील. तथागत गौतम बुद्धांनी सुद्धा बौद्ध धर्म तत्त्वज्ञानामध्ये विश्वशांतीचा संदेश दिला आहे. गौतम बुद्धांनी शांतता, अहिंसा, दया, करुणा, समतेचा संदेश दिलेला आहे तथागत गौतम बुद्धांनी `अत्त दिपो भव` म्हणजे स्वयंप्रकाशित व्हा असा संदेश दिलेला आहे. दया, क्षमा, शांती या तत्त्वांमध्ये तो सामावलेला आहे. त्या अनुषंगाने मानवतावादी दृष्टिकोन निर्माण होईल. तात्पर्य हे विश्वची माझे घर हे संकल्पना पूर्णत्वास येईल. आज संपूर्ण जग शांतता, सुख, समाधान आणि आनंददायी जीवन जगू इच्छिते. हे मिळवून देण्याचे सामर्थ्य महापुरुषांच्या ल्याणकारी विचारांमध्ये प्रामुख्याने दिसून येते. साने गुरुजींच्या `खरा तो एकची धर्म` या प्रार्थनेतून जगण्याचे अनेक आयाम स्पष्ट होतात. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर निरंतर, मतितार्थ

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

आणि दिव्यत्व या परमपूज्य साने गुरुजी रचित ओळीतील शब्दांमध्ये ओतप्रोत भरलेले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत महात्मे बसवेश्वर यांनी जीवनाचा खरा अर्थ समजावून सांगितला आहे. एकूणच संत वाङ्मयाच्या अभ्यासाने आपला मानवतावादी दृष्टिकोन तयार होतो.

## वसुधैव कुटुंबकम संकल्पनेची उत्पत्ती :

`वसुदेव कुटुंबकम` ही संकल्पना प्राचीन वैदिक वाङ्मयातील मोहोपनिषद या ग्रंथातून मांडली गेली आहे. त्याचप्रमाणे पंचतंत्र, हितोपदेश या ग्रंथामध्ये सुद्धा या संकल्पनेचा उल्लेख आढळून येतो. वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेला फार उदात्त आणि व्यापक महत्त्व आहे. या संकल्पनेत संपूर्ण विश्वालाच कुटुंब मानण्याची उदात्त कल्पना सामावलेली आहे. या संकल्पनेच्या माध्यमातून संपूर्ण मानव जातीच्या एकात्मतेवर भर देण्यात आलेला आहे. केवळ मानव जातीच्याच नाही तर विश्वातील सर्व प्राणीमात्रांच्या विषयी करुणा, दया, प्रेमाची भावना या संकल्पनेत अभिप्रेत आहे.२१ व्या शतकात दहशतवादाने डोके वर काढले आहे. परधर्मीयांविषयीचा तिरस्कार राष्ट्रां राष्ट्रांमध्ये निर्माण झालेला संघर्ष या प्रश्नांनी सारे विश्व हवालदिल झालेले आहे. अशा काळात साऱ्या विश्वामध्ये प्रेमाचे ,सहकार्याचे, स्नेहाचे वातावरण निर्माण करण्यासाठी निश्चितच `वसुधैव कुटुंबकम` ही संकल्पना महत्त्वपूर्ण ठरेल यात शंकाच नाही. वैश्विक कल्याण हे महत्त्वपूर्ण उद्दिष्टे आणि साध्य या संकल्पनेत दडलेले आहे. वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना प्राचीन सनातन धर्मात प्रकर्षाने जाणवते. या सनातन धर्मात सर्वांना सामावून घेण्याची दृष्टी होती. वैदिक धर्मामध्ये सुद्धा निसर्गाला... निसर्गातील विविध घटकांना परमेश्वराचे रूप मानले जात होते. सूर्याला देवता मानले जात होते. नदीला माता मानले जात होते. पृथ्वीला भूमाता म्हटले जाते. नदीला आलेल्या महापुराची ओटी भरली जात होते. वादळाचं रुद्र रूप धारण केले की त्याला परशुरामाचा अवतार मानले जात होते. गाईचे गोमाता म्हणून सन्मानाने पूजन केले जात होते. निसर्गातील विविध झाडे, वनस्पतींची पूजा केली जात होती. अखिल प्राणिमात्रांमध्ये नैसर्गिक अविष्कारामध्ये ईश्वराचं अस्तित्व मानले जात होते. म्हणजेच ईश्वराचे अस्तित्व चराचरसृष्टीत आहे.समाजाची अशी धारणा होती. आमच्या वैदिक काळातील ऋषीमुनींनी सुद्धा सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करा, निसर्गावर प्रेम करा, बंधूभावाने वागा असाच संदेश दिलेला दिसतो. प्राचीन वैदिक धर्मात वसुधैव कुटुंबकमची संकल्पना अस्तित्वात असलेली दिसून येते. विश्वातील साऱ्याच मानव जातीने बंधू भावाच्या प्रेमाच्या आणि खेळीमेळीच्या वातावरणात राहावं. द्वेष, तिरस्कार या बाबींचा पूर्णपणे त्याग करावा. प्राणीमात्रांविषयी भूतदया असावी हे वसुदेव कुटुंबकम संकल्पनेत अपेक्षित होते. या गोष्टी प्राचीन वैदिक काळात प्रामुख्याने आढळून येतात. प्राचीन काळात केवळ मानव जातीलाच नाही तर निसर्गातील नैसर्गिक संपत्ती, पशुपक्षी या साऱ्यांनाच एका परिवाराचे कुटुंबाचे भाग मानले जात होते.

## वसुधैव कुटुम्बकम संकल्पना काळाची गरज :

वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेचा पुन्हा एकदा साऱ्या विश्वानेच जागर करण्याची आवश्यकता आहे. सृष्टीतल्या केवळ मानवालाच सदसद विवेक बुद्धीचे वरदान परमेश्वराने दिलेले आहे. या बाबीची जाणीव सर्व मानव जातीला असणे गरजेचे आहे. प्राचीन काळातील मानवाने आपल्या या वैशिष्ट्याचा उपयोग निश्चितच करून घेतला. त्यांनी निसर्गातील प्राणी, पशु, पक्षी, वन्यजीव वनस्पती सगळ्यांचाच सन्मान, आदर करून सामंजस्याचे निर्मळ असे वातावरण निर्माण केले. आज मानवाने निसर्गावर अतिक्रमण केलं आहे. मोठी जंगलतोड सुरू केली आहे. आधुनिकीकरणाच्या नादात नैसर्गिक संपत्तीचे अतोनात नुकसान सुरू आहे. निसर्गाला डीवचण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात सुरू आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे नैसर्गिक बाबींचे अतोनात नुकसान सुरू झालेले आहे. द्रुतगती महामार्ग, औद्योगीकरण या बाबींमध्ये प्राणिमात्रांची घरटीच उध्वस्त होत आहेत. निसर्गातील सर्व प्राणीमात्र त्यामुळे हवालदील झालेले आहेत. निर्वासितांसारखी ते बेफान होऊन सैरावैरा फिरतायेत. त्यांच्या अन्नपाण्याचीच साखळी आपण तोडली आहे. त्यांच्या जीवावरच मानव उठल्यामुळे प्राणी मात्रांची अस्वस्थता वाढलेली आहे. आधुनिक काळात `वसुधैव कुटुम्बकम` ही संकल्पना जणू मोडकडीस निघत आहे. त्यामुळे अनेक संकटे, नैसर्गिक प्रकोप,

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

युद्ध दहशतवादी कारवाया यासारख्या बाबींना साऱ्या विश्वालाच सामोरे जाणे भाग पडत आहे. सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करा, निसर्गावर प्रेम करा आणि त्यांच्या सानिध्यात सर्व मानव जातींनी सहचर्याने, प्रेमाने राहावे हे वसुदेव कुटुंबकम या संकल्पनेत सामावलेले आहे. परंतु काळानुरूप या बाबी हळूहळू लोप पावत आहे. मानवी समाजाची तर त्याहून अधिक वाईट परिस्थिती आहे. श्रेष्ठत्ववादाच्या नादात आम्हीच श्रेष्ठ हे ठरविण्यासाठी जास्तीत जास्त सहारक आयुध तयार करण्यामध्ये राष्ट्रांमध्ये जणू चढावळच लागलेली आहे. साम्राज्यवादी धोरणाने पुन्हा डोके वर काढले आहे. सीमा वादाचा प्रश अनेक ठिकाणी निर्माण झालेला आहे. धर्मवेड्या जनतेचा भावनांचा आधार घेऊन धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न अतिरेकी विचारसरणीची माणसं मोठ्या प्रमाणात करताना दिसतात. त्यातून धर्मयुद्धासारखे प्रश्न निर्माण होऊ पाहत आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतात २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आम्ही भारतीय संविधानचा अंगीकार केला. यानुसार आमच्या संविधानात स्पष्ट उल्लेख आहे की, आम्ही भारताचे लोक भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकास सामाजिक, आर्थिक, राजनीतिक, न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र दर्जाची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा निर्धार केला. म्हणजेच वैविध्यपूर्ण असलेल्या आपल्या राष्ट्राने एकात्मता, समानता आणि स्वातंत्र्य या तत्त्व प्रणालीचा अंगीकार करून वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेचा आदरच केलेला आहे. आमचे वैदिक तत्त्वज्ञानच सांगते की, विश्वातल्या सर्व मानवांनी प्रेमाने, सहचार्याने ,एकजुटीने अगदी खेळीमेडी च्या वातावरणात राहावे. परधर्मीयांचा द्वेष करू नये. आपण सारी परमेश्वराची लेकरे आहोत. हा आपला पारंपारिक संदेश नेहमी स्मरणात ठेवावा. निसर्ग आणि प्राणीमात्रांचा आदर करावा. द्वेष, तिरस्कार, स्वार्थी भावना या गोष्टीना स्पर्शही करू नये. जात, धर्म, पंथ, प्रांत, देश, लिंग या साऱ्या बाबींच्या मानव निर्मित भिंती उध्वस्त कराव्यात. तेव्हा खऱ्या अर्थाने वसुधैव कुटुंबकम ही आपली प्राचीन संकल्पना पूर्णत्वास येईल. हे विश्वचि माझे घर हा विचार विश्वशांतीसाठी, वैश्विक विकासासाठी, जगत कल्याणासाठी मोलाचा ठरेल. त्यायोगे वैश्विक कल्याण साधेल यात तीळ मात्र शंका नाही.

## संदर्भ साधने :

संत ज्ञानेश्वर: ज्ञानेश्वरी

वैदिक ग्रंथ: महाउपनिषद

हीतोपदेश: नारायण पंडित

दैनिक सकाळ वृत्तपत्र

प्राचीन भारत का इतिहास: डॉ. अजयपाल सिंह , विश्वकर्मा

भारत का प्राचीन अतीत: डॉ. आर. एस. शर्मा

प्राचीन भारताचा इतिहास: डॉ. सुमन वैद्य

भारताचे संविधान (मराठी आवृत्ती): डॉ. बाबासाहेब आंबेडकर ( संपादक_ ॲड संदेश भालेकर, पंकज कुमार)

साप्ताहिक: आपलं महानगर

साने गुरुजींची जीवनगाथा: राजा मंगळवेढेकर